# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.10.2024** **वार:शुक्रवार**

---

1. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय
2. मायमराठीसाठी हा सोन्याचा दिवस असल्याची मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया; साहित्यविश्वातूनही आनंद व्यक्त
3. जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेशासंदर्भात युनेस्कोच्या शिष्टमंडळाची रायगडाला भेट
4. शारदीय नवरात्रोत्सवाला राज्यात उत्साहात प्रारंभ आणि
5. 2022-23 साठीचे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर, बॅडमिंटनपटू प्रदीप गंधे यांना जीवन गौरव पुरस्कार

**अभिजात भाषा**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती देताना सांगितलं. मराठीसह बंगाली, आसामी, प्राकृत आणि पाली या पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून मराठी साहित्यिक आणि भाषा अभ्यासकांनी ही मागणी लावून धरली होती. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी एक चळवळच उभी करण्यात आली होती. राज्य सरकारनं ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या नेतृत्वाखाली एक समितीदेखील नेमली होती. या समितीनं अत्यंत अभ्यासपूर्ण अहवाल केंद्राकडे सादर केला होता. या सर्व प्रयत्नांना काल अखेर यश आलं.

केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर अवघ्या मराठी साहित्य विश्वातून आनंदाची भावना व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत. मराठी भाषेच्या इतिहासात हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल; प्रत्येक मराठी माणसासाठी हा अभिमानाचा क्षण असून आपल्या भाषेची समृद्धी आणि वारसा जपण्यासाठी हे महत्वाचं पाऊल ठरेल अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री, आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉक्टर सदानंद मोरे या निर्णयानंतर आकाशवाणीशी बोलताना म्हणाले......

**युनेस्को-रायगड**

जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेशासाठी नामांकनाच्या मूल्यांकन प्रक्रियेचा एक भाग म्हणून युनेस्कोच्या शिष्टमंडळानं काल रायगड किल्ल्याला भेट देऊन पाहणी केली. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि राज्य पुरातत्व विभागाचे अधिकारीही यावेळी उपस्थित होते. या पथकानं कुशावर्त तलाव, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, हत्तीखाना, भवानी मंदिर आणि टकमक टोक, या महत्त्वपूर्ण ठिकाणांसह विविध ऐतिहासिक ठिकाणांना भेट दिली. तसंच किल्ल्याचा इतिहास आणि सद्यस्थितीबद्दल तपशीलवार माहिती घेतली.

**कौशल्य विद्यापीठ**

राज्य शासनानं युवकांच्या विकासासाठी कौशल्य विद्यापीठ स्थापन केलं, ही अत्यंत अभिमानाची बाब असून राज्याच्या कौशल्य विकास विभागानं नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे, असे कौतुकोद्गार केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी काढले आहेत. मुंबईच्या एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयात आय. टी. आय मुंबईचं नामकरण भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई असं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

**नवरात्रोत्सव**

आश्विन शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर कालपासून राज्यात शारदीय नवरात्रोत्सवाला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. आता पुढचे नऊ दिवस देवीच्या विविध रुपांचं पूजन केलं जाईल. तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची अंबाबाई, वणीची सप्तशृंगी आणि माहूरची रेणुका या राज्यातल्या साडेतीन शक्तीपीठांच्या मंदिरांमध्ये नवरात्रोत्सवाला घटस्थापनेनं प्रारंभ झाला. श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिरात छत्र चामरं ढाळंत, संबळाच्या कडकडाटात, 'आई राजा उदो उदो' च्या गजरात घटाची कल्लोळतीर्थापासून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती. काल पहिल्या दिवशी करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीची पूजा श्रीमहालक्ष्मी रुपात बांधण्यात आली होती. श्री क्षेत्र माहूर इथंही अलंकार पूजा करण्यात आली. वणी

इथल्या सप्तशृंगी देवीच्या मंदिरातही उत्साहात घटस्थापना करण्यात आली. राज्यात इतरत्रही ठिकठिकाणच्या देवी मंदिरांमध्ये उत्सव सुरु झाला आहे. घराघरातही विधिवत घटस्थापना करुन आदिशक्तीचा जागर आणि पूजन केलं जात आहे.

**पोहरादेवी-वाशीम**

वाशीम जिल्ह्यात मनोरा तालुक्यातल्या 'बंजारा समाजाची काशी' मानल्या जाणाऱ्या पोहरादेवी इथं बंजारा विरासत संग्रहालय उभारण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या या संग्रहालयाचं लोकार्पण केलं जाणार आहे.

**राहुल गांधी-कोल्हापूर**

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी आजपासून दोन दिवस कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. कसबा बावडा इथल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण त्यांच्या हस्ते होणार असून उद्या ते संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार आहेत.

**मुख्यमंत्री भूमिपूजन-बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यात खामगांव तालुक्यातल्या घाटपुरी इथं श्री महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान, आळंदी अंतर्गत जय जगदंबा वेद विद्यालयाच्या नवीन वास्तूचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल करण्यात आलं. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला.

**अजित पवार**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातल्या 1 कोटी 96 लाख 43 हजार 207 पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. उर्वरित पात्र महिलांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**क्रीडा पुरस्कार**

राज्य सरकारतर्फे दिला जाणारा 2022-23 या वर्षासाठीचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार बॅडमिंडनपटू आणि प्रशिक्षक प्रदीप गंधे यांना जाहीर झाला आहे. उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक आणि जिजामाता पुरस्कार क्रिकेटसाठी दिनेश लाड, पॅराशूटींगसाठी सुमा शिरुर, दिव्यांगांच्या ॲक्वेटीक्सकरता राजाराम घाग, धनुर्विद्येसाठी शुभांगी रोकडे, जिम्नॅस्टिकसाठी पवन भोईर आणि कबड्डीसाठी अनिल घाटे यांना जाहीर झाला. खेळाडूंच्या श्रेणीमध्ये ॲथलेटिक्समध्ये अविनाश साबळे, नेमबाजीत रुद्रांश पाटील आणि शाहू माने, नौकायन विष्णू सर्वानन यांच्यासह इतर 47 खेळाडूंना पुरस्कार जाहीर झाले आहेत. साहसी क्रीडा प्रकारात जल क्रीडा प्रकारात जयंत दुबळे आणि जमिनीवरील क्रीडा प्रकारात कस्तुरी सावेकर यांचा या पुरस्कारानं गौरव केला जाणार आहे. दिव्यांग श्रेणीतही 6 महिला आणि 2 पुरुषांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**महिला क्रिकेट**

महिलांच्या टी-ट्वेंटी विश्व करंडक स्पर्धेला कालपासून शारजा इथं सुरुवात झाली. भारताचा पहिला सामना आज न्यूझीलंडबरोबर होणार आहे. येत्या 20 तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत दहा संघ उतरले आहेत.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.